श्री

# श्री संत तुकाराम महाराज



यांनी

# सांगितलेलें ब्रह्मज्ञान

९८८१
. ग्रं. सं. ठाणे
निबंध
७३५९
REFBK-0011484

लेखक:—
गोविंद रत्नपारखी
नांदगांव ( नासिक )

श्री

# श्री संत तुकाराम महाराज



यांनी

# सांगितलेलें ब्रह्मज्ञान

REFBK-0011484

मुरलीधर गोविंद रत्नपारखी

नांदगांव ( नासिक )

# धन्यवाद

## कै. भाऊशेठ रामचंद्रशेठ खरोटे (सराफ)

## नांदगांव

प्रेमळ व सर्वांच्या उपयोगी पडण्याची वृत्ति, या गुणांवर गरिबींतून ज्यानें मोठें भांडवल उभें करून भव्य सराफी दुकान थाटलें त्या धाडसी कै. भा रा. सराफ यांचे चिरंजीव श्री. काशीनाथ भाऊशेठ व प्रभाकर भाऊशेठ खरोटे (सराफ) रा. नांदगांव (नासिक) यांनी वडिलांचे स्मरणार्थ सर्वांत श्रेष्ठ असलेले दान जें ज्ञानदान तें साधण्यासाठीं "श्रीसंत तुकाराम महाराज यांनीं सांगितलेलें ब्रह्मज्ञान" या पुस्तकाच्या एक हजार एक प्रती छापून त्या आपल्या भारतांतील वाचनालयांना, धार्मिक संस्थांना व हरिजनांना विनामूल्य वांटल्या आहेत. त्यामुळें आर्यसंस्कृतीचे मूळ तत्वज्ञान सर्वांना समजणें सुलभ झालें आहे. या त्यांच्या उदार वृत्तीबद्दल धन्यवाद. धनिकांना अशीच सद्बुद्धि सतत होवो हीच प्रार्थना.

महाराष्ट्र राज्य<br>दिन १९६१<br>निमित

नम्र<br>**मु. गो. रत्नपारखी**<br>**(नांदगांव)**

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम 37809 वि: निबंध
क्रमांक 1327 नों. दि: 24/7/92



कै. भाऊशेठ रामचंद्रशेठ खरोटे (सराफ)

नांदगांव

अनुक्रमांक ....३७५०८...... दि: १०।९।५८
[illegible] ......१३५८१...... नों दि: २५।१०

# श्रीसंत तुकाराममहाराज यांनीं सांगितलेलें ब्रह्मज्ञान

१७८८४

आपली आर्यसंस्कृति सांख्य, वेद, उपनिषदें व योगशास्त्र यांतील तत्वज्ञानावर आधारलेली आहे. या सर्व शास्त्रांचें श्रीमत् भगवद्गीता हें थोडक्यांत सांगितलेलें सार आहे. हीं शास्त्रें आत्मानुभवी संतांनीच सांगितलेलीं आहेत. आत्मानुभव प्राप्त होण्याचे सुमारास किंवा प्राप्त झाल्यानंतर, सर्व प्रकारचें ज्ञान आणि सामर्थ्य भक्तांचे ठिकाणी निर्माण होत असते. त्या सामर्थ्याचे पोटींच वाचासिध्दी प्राप्त होत असते. खुनी व दरोडेखोर असलेला वाल्या कोळी जो पुढें भक्तिमार्गाचे बळावर वाल्मीक ऋषि होऊन वंदनीय म्हणून मानला गेला, तो कांहीं कुठे शाळा कॉलेजांत अगर त्या वेळीं प्रचारांत असलेल्या ऋषिमुनींच्या आश्रमांत शिक्षणासाठीं राहिला नव्हता. असें असतांनाही जगाला नीतिशास्त्र व तत्वज्ञान शिकविणारे रामायण हें महाकाव्य संस्कृत भाषेंत त्यानें सांगितलें. " कोळीयाची कीर्ती वाढली गहन। केले रामायण रामा आधी ।।१४५५. भक्तीमुळे साधकाचे अंगी निर्माण होणारे निरनिराळ्या प्रकारचे सामर्थ्य योगशास्त्रानें खुलासेवार वर्णन केलेलें आहे. थोडक्यांत ते सांगावयाचे झाल्यास " जगांत अशक्य असे त्याला ( भक्ताला ) कांहींच नसते. वाचासिद्धीच्या प्राप्तीमुळें वाल्मीक ऋषींना जसें रामायण हें काव्य लिहिता व सांगता आलें, तसेंच आपल्याकडे निरनिराळ्या सत्पुरुषांना मराठी भाषेंत काव्यरूपानें तत्वज्ञान सांगता आलें. श्री ज्ञानेश्वर श्री नामदेव श्री एकनाथ श्री समर्थ श्री तुकाराम इ. संतांनी ते अशिक्षित असतांनाह जी ग्रंथरचना केली, ती केवळ त्यांना प्राप्त झालेल्या वाचासिद्धीचे बळावरच होय. याला अनुसरूनच

तुकोबांनी " करितो कवित्व म्हणाल हे कोणी। नव्हे माझी वाणी पदरीची ।। माझीये युक्तीचा नव्हे हा प्रकार। मज विश्वंभर बोलवितो ।। काय मी पामर जाणे अर्थभेद। वदवी गोविंद तेंचि वदे ।। १००७. असें म्हटलें आहे. त्याचप्रमाणें स्वप्नांत ( पारमार्थीक दृष्टया, आपल्या क्षणभंगुर अस्तित्वाला एक प्रकारचे स्वप्नच संबोधिले जाते ) झालेल्या गुरुउपदेशाप्रमाणें नामयोगावर विश्वास ठेऊन विठोबाचे चरणीं लागलो, नंतरच कवित्वाची स्फूर्ति झाली ।। १३३३. असेही त्यांनीं सांगून ठेविले आहे. तुकोबा अशिक्षित होते याला पुरावा-विद्या असती कांहीं। तरी पडतो अपाई ।। बरा कुणबी केलो नाहीं। तरी दंभेचि असतो मेलो ।।३२०. त्यांनींच सांगून ठेविले आहे. उष्टया पत्रावळी करूनिया गोळा। दाखविती कला कवित्वाची ।। १२८४. अशा प्रकारचे हे कवित्व नव्हे.

सांख्य, वेद, उपनिषदें व योग या शास्त्रांनीं मानवाला तूं मनुष्य नसून सर्वत्र व्यापून असले आत्मतत्व म्हणजेच प्रत्यक्ष परमेश्वर आहे, हें पटवून देण्यासाठी साधनें सांगितलीं आहेत. हींच साधनें सोप्यांत सोपी करून श्री ज्ञानेश्वर श्री तुकाराम इ. संतांनीं मराठी भाषेंत विषद करून सांगितली. हीं साधनें सांगण्याचें कारण, आपण ज्यासाठीं हा मनुष्यदेह धारण केला आहे तें तत्वच आज मुळांत विसरलो, साखरेला साखरेची गोडी म्हणजेच आपण गोड आहोत हा अनुभव तिच्यापासून विभक्त असल्याशिवाय घेतां येणार नाहीं, तद्वतच आत्मस्वरूपाला आपलें रूप पहाण्यासाठीं म्हणजेच आपल्या ठिकाणीं काय, कोणते व किती सामर्थ्य आहे हें पहाण्यासाठीं आत्मरूपापासून विभक्त व्हावें लागलें. एकाएकी आतां असावेसे वाटे। तरीच हे खोटे चाळे केले।। उजेडाचा केला दाटोनी अंधार। सर्व हुद्देदार चेष्टविला ।। २१७१. यालाच मानस म्हणजे मनानें निर्माण केलेले भाव (इच्छा) गी. ।।१०-६. म्हटलें जातें. या भावापोटींच पंचमहाभूतें व सत्व रज तम हे त्रिगुण अशी अष्टधा प्रकृति निर्माण झाली. अव्यक्त ते आकारले। रूपा आले गुणवंत ।। तुका म्हणे पुरवी इच्छा। जया तैसा विठ्ठल ।। ११५. वीस लक्ष योनी वृक्षामाजी घ्याव्या.

जलचरी भोगाव्या नवलक्ष ।।अकरा लक्ष योनी किडयामाजी घ्याव्या।। दश-लक्ष भोगाव्या पक्षांमध्ये ।। तीस लक्ष योनी पशूंचीये घरीं ।। मानवाभितरी चार लक्ष।। तुका म्हणे तेव्हां नरदेह नरा। तयाचा मातेरा केला पुढें ।।४४४३. अनंत जन्मींचे शेवट पहातां। नरदेह हातां आला तुझ्या ।।३९१५. आत्मस्वरूपाच्या संकल्पाप्रमाणें त्याचा प्रवास सुरू झाला. प्राणशक्ति निर्माण झाली. आकाश, वायु, तेज, आप आणि पृथ्वीतत्व अस्तित्वांत आलें. वनस्पती कीटक ( यांत जलचरांचाही समावेश होतो ) पक्षी व पशू या चौ ( चार ) राशींतील लाखो योनी म्हणजेच चौऱ्यायशी लक्ष जीवयौनी होत. केलेला संकल्प या जीवयौनी निर्माण करूनही पूर्ण झाला नाहीं म्हणूनच मनुष्यदेह धारण करावा लागला. त्यांतच आपलें उद्दिष्ट, साध्य झालें व जन्माचें सार्थक झालें, असें दिसून आलें. आणि त्यांतच आत्मरूप सर्वव्यापी प्रकाशमय, चैतन्याचा अथांग महासागर, आनंदाचा कंद व प्रचंड सामर्थ्य असलेली शक्ति आहे वगैरे अनुभव प्राप्त झाले. अखंड क्षीराब्धी भरिते आले । आध्यात्म विद्येचे भांडार उघडिले । सूर्य कोटीस तेज फांकले। ध्यानीं प्रगटले भक्ताचिया ।।६७२. स्थिरावली वृत्ति। पांगुळला प्राण । अंतरीची खूण पावुनिया । पुंजावले नेत्र झाले अर्धोन्मिलित । कंठ सद्गदित रोमांच आले।। चित्त दाकाटले स्वरूपा माझारी । न निघे बाहेरी सुखावलो।। सुनीळ प्रकाश उदैजला दिन। अमृताचे पान जिवनकळा।। शशी सूर्य झाली जीवे ओवाळणी ।आनंदा दाटणी आनंदाची ।। तुका म्हणे सुखें प्रेमासी डुल्लत । विरालो निश्चित निश्चितीनें ।। ४१५९. गेला कोठे होता कोठुनिया आला। सहज व्यापला आहे नाहीं।। कोठे नाहीं ऐसा नाहीं रिता ठाव। अनुभवीं देव स्वये झाले ।। ४६०५. या प्रयत्नांतच आदिभौतिक, आधिदैविक व आध्यात्मिक शास्त्रें निर्माण झालीं.

पंचमहाभूतांचे अस्तित्व सर्व जीवयौनींत कसें असतें हें पहाणें मोठे मनोरंजक आहे. अस्थी, कातडी, मांस नाडया व लव हे पृथ्वीतत्व, लाळ मूत्र, रक्त, मज्जा, रेत ही आपतत्व, तहान, भूक, झोप, आळस, संग हे तेजतत्व, चलनवलनाचे प्रकार, आंखडणे, पसरणें, पळणें, धावणे, अडकणे

हे वायुतत्व, काम, क्रोध, शोक, मोह, मद ही आकाशतत्वाची लक्षणें होत. प्रत्येक यौनीमध्यें कांहींना कांही उणीव भासल्यानेंच ती दूर करण्याकरितां निरनिराळ्या यौनी अस्तित्वांत आल्या. जैसा मनोरथ जये चित्ती कामा। तैसा मेघश्याम पुरवितो ।।४५१७. यालाच उत्क्रांतिवाद म्हटलें जाते. यालाच अनुसरून प्राण्यांची कर्मेन्द्रियें व ज्ञानेंद्रियांची उत्पत्ति व वाढ हळू हळू गरजेंनुरूप होत गेली. पंचप्राण (प्राण, अपान, व्यान, उदान, समान) पंचमहाभूते, शब्द, स्पर्श, रूप, रस, आणि गंध हे पंचविषय जाणणारी कान, कातडी, डोळे, जिव्हा आणि नाक ही पंचज्ञानेंद्रियें, हात, पाय, गुद, शिस्न आणि वाणी ही पाच कर्मेन्द्रिये, या सर्वांना प्रेरणा देणारें अंत:करण पंचक (मन, बुद्धि, चित्त, अहंकार आणि चैतन्य) अशा पंचवीस तत्वांचे हे आपल्या शरिराचे गाठोडे हळू हळू चौऱ्यायशी लक्ष जीवयौनींत वाढ-वीत वाढवीत आज आपण तयार केले आहे. सात (पुरुष, प्रकृती, पंच-प्राण) पांच (पंचमहाभूतें) तीन (त्रिगुण) दशक (पांच कर्मेंद्रियें पांच ज्ञानेंद्रियें) ही पंचवीस तत्वें कांहींनीं गृहित धरिलीं आहेत.

आपण केलेल्या प्रयत्नामुळें ज्याप्रमाणें पृथ्वीला आस्तित्व प्राप्त झाले त्याचप्रमाणें इतरांनीं केलेल्या प्रयत्नामुळें पृथ्वीबाहेरील प्रचंड विश्व अस्तित्वांत आलें. सूर्य, ग्रह, नक्षत्रें, तारकापुंज वगैरेही त्यांचीच दृश्य फलें होत. आरंभी आरंभी जे मनुष्यप्राणी जन्माला आले त्यांना आपण कशासाठीं मनुष्यदेह धारण केला आहे याची स्मृति (जाणीव) होती. त्यामुळेंच त्यांना आत्मानुभव सुलभ झाला. प्रथमारंभीं सर्व मनुष्य-जात ही आत्मानुभवासाठींच जन्माला आली आहे ही जाणीव असल्यानें त्यांतच खाद्यपेयांची विपुलता निसर्गानें करून ठेवल्यानें समाजांत आप-परभाव निर्माण होणें शक्य नव्हते. आज आपणाला नर, नारी बाळें अवघा नारायण। ऐसे माझे मन करी देवा ।।४११३. अशी प्रार्थना करावी लागते. पण त्या काळीं आपण सर्व परमेश्वरी अंश आहोत, एकाच परमे-श्वराची लेकरें आहोत, आपण केवळ आत्मानुभवासाठींच जन्म घेतला आहे, अशीच समाजाची धारणा होती. त्यामुळें सहजच नर, नारी, बाळ-

अवघा नारायण। समजलें जाई. कालांतरानें समाज हळू हळू वाढूं लागला. त्याबरोबर गरजाही वाढीस लागल्या. तसेंच कार्यक्षेत्रही वाढूं लागलें. मुलाबाळांच्या त्याचप्रमाणें नातलगांच्या सुखासाठीं मनुष्याला कर्तव्य करणें इष्ट ( जरूर ) वाटलें, हीच कर्मयोगाची सुरवात. कर्म म्हटलें म्हणजे त्यांत चांगलें, मध्यम, कनिष्ट आलेंच. अशा प्रकारें सत्त्व रज, तम या त्रिगुणांचा उगम झाला आणि कर्म त्याचे क्रियमाण, यांचाच सांठा म्हणजे संचित हेंच प्रारब्ध म्हणून उदयाला आलें. ऐशा देवाच्या विभूति। भिन्न प्रारब्धाची गति।। प्रकाराचे तीन। तुका म्हणे केले जन।।७२५. प्रारब्ध क्रियमाण संचिताचे। वोढत ठायींचे आले साचे ।।१११५. व्यवसाय निमित्त फल देतसे संचित ।।१६३४. सत्वगुण सुखाची हौस उत्पन्न करतो, रजोगुण कर्माविषयीं आसक्ति आणि तमोगुण ज्ञानावर आवरण घालून कर्तव्य मूढतेच्या आडमार्गाकडे माणसाला नेतो. ( गी. १४-९ ) यांतूनच काम, क्रोध, लोभ वगैरे षड्रिपूंची निर्मिती होते. यांतच ऋण, वैर, हत्या यांची भर पडते. अशा रीतीनें मनुष्यप्राण्यांत मी आणि माझें, तू आणि तुझें असा आपपर भाव निर्माण झाला. आणि व्यक्तिव्यक्तींत, समाजांत व देशादेशांत स्वार्थ शिरला. त्यामुळें तटे मांडणाला सुरवात झाली आणि आपलें खरें कर्तव्य जें आत्मरूपदर्शन तें आज आपण मुळांतच विसरलो. आपुलिया हिता जो असे जागता। धन्य मातापिता तयाचीया।। कुळीं कन्यापुत्र होती जी सात्वीक। तयाचा हरीख वाटे देवा ।। गीता भागवत करिती श्रवण। आणिक चिंतन विठोबाचे ।। तुका म्हणे मज घडो त्यांची सेवा। तरी माझ्या दैवा पार नाही ।।३४०. अशी आदर्श कुटुंबें त्यामुळें आज दुर्मिळ झाली. परकिया नारी माऊलीसमान। मानिलिया धन काय वेचे ।। न करितां परनिंदा, परद्रव्य अभिलाष। काय तुमचे यास वेचे सांगा ।। बैसलिये ठायीं म्हणतां राम राम। काय होती श्रम ऐसे सांगा ।। संतांचे वचनीं मानितां विश्वास। काय तुमचे यास वेचे सांगा ।। खरे बोलतां कोण लागती सायास। काय वेचे यास ऐसे सांगा ।तुका म्हणे देव जोडे याचसाठी। आणिक ते

आटों न लगे कांहीं ।। ६१. सत्य दी करी संसार सकळ। अलिप्त कमळ जळीं जैसे ।। १०२५. सत्य तोंचि धर्म असत्य ते कर्म। आणिक ते वर्म दुजे नाहीं ।। १०२७. सत्यानें वागणारे संसारी आज किती सांपडतील ? वास्तविक आपल्या आर्य संस्कृतीनें जे चार आश्रमधर्म निर्माण केले, त्याप्रमाणें वागल्यास मुक्ति दूर नाहीं. ब्रह्मचारी धर्म घोकाळे अक्षर। आश्रमी विचार षट्कर्मे ।। वानप्रस्थ तरी संयोगी वियोग। संन्यास तो त्याग संकल्पाचा ।। परमहंस तरी जाणे सहज धर्म। तेथें याती धर्म कुळ नाहीं ।। १४८४. वैराग्याशिवाय भक्ति नाहीं. वैराग्य आणि भक्ति एक झाल्याशिवाय खरें ज्ञान प्राप्त होणें शक्य नाही. या वैराग्याला गृहस्थाश्रमापासूनच सुरवात होई. ही आश्रमसंस्था अजिबात नष्ट झाली. जोडोनियां धन उत्तम व्यवहारे। उदास विचारे वेच करी।। उत्तमची गति तो एक पावेल। उत्तम भोगोल जीवखाणी।। तुका म्हणे हेची आश्रमाचे फळ। परमपद बळ वैराग्याचे ।। २८६४.

सत्व, रज, तम या त्रिगुणांना अनुसरून आपण कर्मयोग अनुसरतो. सत्य कर्म आचरे होईल हित। वाटेल दुःख असत्याचे ।। ऊंस वाढवितां वाढलिसे गोडी। गुळ साखर हे त्याची परवडी ।।२२६९. विविध कर्मांचे वेगळाले भाव। निवडूनी ठाव दाखवीला ।। तुका म्हणे नाही पापपुण्य खतो। झाडयाची हुज्जती हातां आलो ।। २४१०. या आपण केलेल्या निरनिराळ्या कर्मांचे संचिताचा कालांतरानें परिणाम—एक उंच पदी बैसोनी सुखे। दास्य करवी एका हाती ।। ज्याचीया संचिते जैसे आले पुढे। तयाची तैसीच गती ।। सभाग्य संपन्न आपुलाले घरी। मामके दैन्य बापुडे ।। २०४७. खाटेवरीं पडतां। व्यापी चिंता तळमळ ।। ऐसो गहन कर्मगती। काय तयासी रडती ।। २०४१. आणिक रोगांची नांवे घेऊं किती। अखंड असतील जडोनिया ।।३१३९. पहा हो देवा कैसे जन। भिन्न भिन्न संचिते ।। एक नाही एका ऐसे। दावी कैसें शुद्ध हीन ।।३२४१. संचित प्रारब्ध, क्रियमाण। अवघी झाली गहन।। केली पापपुण्यें। देशोधडो बापुडी ।। ३८२१. काय करुं आतां माझिया संचीता। तेणे जीव वित्ता सारी केली ।।१९८५. पुण्य होते गाठीं।तरी

का लागती हे आटी ।। १९४० . पर्जन्य पडावें आपुल्यां स्वभावें। आपुलाल्या दैवें पिके भूमि।। बीज तेंचि फळ येईल शेवटी। लाभ हानी तुटी ज्याची तया।। २०१०. प्रारब्धेची जोडे धन । प्रारब्धेची वाढे मान ।। प्रारब्धेंची होय सुख। प्रारब्धेंची पावे दु:ख। प्रारब्धेंची भरे पोट। तुका करीना बोभाट ।।२८४९. ३३०१ . अन्न अच्छादन। हे तो प्रारब्धा आधीन ।। १६२४.

हल्लीं पारमार्थिक बाब म्हटली कीं, ती, सब झूट, या सदरांत जमा होते. आणि कसला पुनर्जन्म आणि कसलें प्रारब्ध तुम्ही घेवून बसलात, अशी हेटाळणी करण्यांत येते. हे जग कां, कसें व कोणी निर्माण केलें, कशासाठीं विश्वाचा पसारा केला गेला, निसर्ग म्हणजे काय, तो कसा निर्माण होतो, त्यावर आपण सत्ता चालवूं शकतो काय, जगाच्या पाठीवर आज भारताप्रमाणेंच अनेक लहान मोठे देश आहेत. तेथें अगर भारतांत निरनिराळ्या विचारांची त्याचप्रमाणें सुखी किंवा दु:खी मानवयोनी कां जन्माला आली. जगांत उत्पति ( जन्म ) स्थिति ( जगणे ) आणि लय ( मृत्यू ) ही कशामुळें होतात, याचा विचारच आज कोणी करीत नाहीं. निसर्गाच्या मदतीनें ( त्यावर सत्ता चालवून नव्हे ) आपण आपलें जीवन सुखमय करण्याचा सदोदित प्रयत्न करीत असतो. आकाशांतील ढगांचे गडगडणे व अंगावर शहारे आणणारा विजेचा कडकडाट, समुद्राच्या पाण्याला भरती येते, ओहोटी लागते, त्यावर नियंत्रण किंवा पृथ्वी व इतर ग्रहगोल यांचे गतीचा निरोध आपणांस शक्य नाहीं. जे आपले म्हणून आपण मानतो त्या आपल्या शरीरावरहि आपला ताबा चालूं शकत नाहीं. सूर्याची उष्णता प्रखर झाली, उल्कापात होवूं लागले, सोसाट्याचा वारा सुटला, भूकंपाचे धक्के बसूं लागले, जलप्रलय सुरुं झाला, रोगानें किंवा निसर्गाच्या कोपानें माणसें पटापट मरुं लागली म्हणजे धुंदी आपो-आप उतरते आणि त्यावेळीं देव आठवतो. म्हणूनच तुकोबांनी सांगितले आहे म्हणसी नाहीरे संचित। न करी न करो ऐसी मात ।।१२०३. संकल्पाच्या बीजें इंद्रियांची चाली। प्रारब्ध ते घाली गर्भवासी ।।२५३१. जन्मां येणे घडे पातकाचे मुळें। संचिताचे फळ आपुलिया ।।२८७८. पेरी कडूजिरे मागे अमृत

फळे। अर्कावृक्षा ( रुईचे झाड ) केळे कैसी येती ।। पापाची संचिने देहासी दंडना। तुज नारायणा बोल नाहीं ।।४०५५. जैसा ज्याचा ठेवा, तो त्यापाशी धांवे। न लगती करावे उपदेश।। संचित तैस बुद्धि, उपजे मना- मधी। सांगितले सिद्धी नवजाय।। घेवुनिया उठे अपुलाला गुण। भविष्य प्रमाण, तुका म्हणे ।।४३८१,४४७९ हिरे, दगड, एके खाणी। कैसे विजातीसी पाणी।। ऐसे भिन्न भिन्न सांटे। केले प्रारब्धानें वाटे।। तुका म्हणे शिरी। एक एकाची पायरी ।। २८७. वैद्य वाचविती जिवां। तरी कोण ध्याते देवा ।। काय जाणे कैसीपरी। प्रारब्ध ते ठेवी उरी।। नवसे कन्यापुत्र होती। तरी का करणे लागे पति ।। जाणे हा विचार। स्वामी तुकयाचा दातार ।। ३२९. जिणे पराधीन आणि कां हातीं। दृढ पाशीं बांधलो संचिती ।। प्रारब्ध, क्रियमाण सांगाती। आवंडिली मता आपुलिया ।। ६५४. प्रारब्ध कांही न पालटे सोसे। तृष्णेचे हे पिसे वायाविण ।। ९०६ संचित, प्रारब्ध गाढे। धांवे पुढे क्रिय- माण ।। ९१३. प्रारब्धा हातीं जन। सुख, सीण पावतसे ।। १८०६

तुकाराम महाराजांच्या कालखंडांत आपण म्हणजे आपला भारत संपूर्ण स्वातंत्र्यांत होता. एके काळचे आपल्या भारताचे वैभव पाहून येथे लुटालूट करून आपल्या देशांची भरभराट करावी या हेतूनें मुसलमान पोर्तुगीज, डच फ्रेंच आणि इंग्रज येथे आले. त्यांनीं भारतीयांची कत्तल करून अफाट संपत्ति, सोनें, रुपें, जडजवाहीर वगैरे लुटालूट करून, हत्ती, घोडे, उट यांवर लादून व आगबोटी भरून त्यांचे देशी नेल्या व त्यांचे देश त्यांनी समृद्ध बनविले. अशा प्रकारें त्यांनी भारतीयांना दरिद्रीनारायणाचे अवतार बनविले. कालांतरानें हेही देश आपआपसांतील भांडणामुळे, करावें तसें भरावें याप्रमाणें कंगाल तर बनलेच पण त्यांत त्याची मनुष्यहानीहि मोठ्या प्रमाणावर झाली. ऋण, वैर, हत्या, हे तो न सुटे नेदितां ।। १२२८

आर्य संस्कृतीतील निरनिराळ्या पंथांत भांडणाला सुरवात झाली. त्या संधीचा फायदा परकीयांनी पुरेपुर घेतला. आपला भारत देश स्वाव- लंबी, एकसंधि व सुरक्षाक्षम न बनवितां आमचा धर्म श्रेष्ठ व सोपा म्हणून इतरांचे कल्याणासाठीं त्याचा जगभर प्रसार व्हावा म्हणून आम्ही

एका दारानें बाहेर पडलो आणि नेमक्या त्याच संधीचा फायदा घेऊन परकीयांनी दुसऱ्या दारानें येवून आपले पाय येथें रोवले. आणि त्याचबरोबर त्यांच्या धर्माचा येथें प्रसार करून कोटयावधि बांधव आपणांपासून भिन्न बनविले, विभक्त केले. जगी कीर्ती व्हावी। म्हणोन झालासी गोसावी। बहुत केले पाठांतर। धर्म राहिलेसे दूर।। चित्तीं नाही अनुताप। लटिके भगवे स्वरुप।। तुका म्हणे सिंदळीच्या। व्यर्थ श्रमविली वाचा ।।४११६. यामुळें भारतीय तत्वज्ञान समाजाच्या खालच्या तळापर्यंत कधींच पोंचू शकलें नाही. आणि पारतंत्र्य मात्र नशिबीं आले. हाती होन, दावी बेना। करिती लेकींच्या धारणा।। ऐसे धर्म झाले कळी। पुण्यरंक पाप बळी।। सांडिले आचार। द्विज चाहाड, जाले चोर।। टिळे लपविती पातडी। लेती विजारा कातडी।। बैसोनिया तक्ता। अन्नेविण पिडिती लोका।। मुखाविण लिहिणें तेलतुपाविण जिणे।। निचांचे चाकर। चुकलिया खाती मार।। राजा प्रजा पिडी। क्षेत्रीं, दुश्चितासी तोडी।। वैश्य शूद्रादिक। हे तो सहज नीच लोक।। अवघे बाह्यरंग। आंत हिरवे, वरी सोंग।। तुका म्हणें देवा। काय निद्रा केली धांवा।। २६७ मंता नाही मान। देव मानी मुसलमान।। ऐसे पोटाचे मारिले। देवा आशा, विटंबिले।। घाली लोटांगण। वंदो नीचांचे चरण। तुका म्हणे धर्म। न कळे माजल्याचा भ्रम।। ३२७२. अशा पारतंत्र्यातच खरा धर्म मागे पडून त्याला विकृत स्वरुप प्राप्त होत असते.

जगांत विषमता का? एक श्रीमंत, दुसरा दरिद्री कां? कोणी सुख कोणी दुःख भोगतो, असे कां? इतर देशांत आबादीआबाद आणि आपलें-कडे दुर्भिक्ष कां? आपल्या देशांत पाऊस, ऊन थंडी वेळेवर पडत नाही, असें कां व्हावें? तसेंच पारतंत्र्य व त्यांचे झालेले परिणाम इ. विषयांचा उलगडा आतांपर्यंत तुकोबांनी केला. त्याचे वर्म–पापपुण्य दोन्ही वाहती मारग। स्वर्ग नर्क भोग याची पेणी।। २००४. आपणची तारीं आपणचि मारी। आपणचि उद्धारी आपण या।। २०४२.

ज्या भारतानें जगांत सर्वप्रथम सुवर्णचलन चालू केले, तेथें आज निकलची नाणी आस्तित्वांत असावी हा चुकीच्या कर्मभोगाचा भोग होय.

भारताचे वैभव कायम टिकविलें गेलें असतें तर आज भारतानें जगाला खरेदी घेतले असते. अमेरिकेजवळ आज जें वैभव दिसते त्याहुन किंबहुना जास्त संपत्ति, एका सोरटीसोमनाथाच्या मंदिरांत होती. आज निरनिराळ्या जातींमुळें व पक्षांमुळे भारतांतील जनतेंत जसे तट पडलेले दिसताल तसेच तट प्राचीन काळीं निरनिराळ्या धर्मपंथांमुळें पडले गेले. जो तो स्वतःच्या पंथापुरतेच पाही. स्वदेशाभिमान नष्ट झाला. त्यामुळे समाज संघटित होऊं शकला नाही. समाज विस्कळित होणें म्हणजेच पारतंत्र्याला आमंत्रण देणें होय. पारतंत्र्यामुळें तुकोबांच्या वेळीं देशांत हलाखीची स्थिती निर्माण झाली होती. संसार तापे तापलो मी देवा। करितां या सेवा कुटुंबाची ।। तुका म्हणे आतां धाव घाली वेगी। ब्रीद तुझे जगीं दिनानाथा ।।९१. आज आपण स्वतंत्र आहोत. पारतंत्र्यामुळे झालेलें नुकसान भरून काढण्यासाठीं व देश पूर्ववत् समृद्ध करण्यासाठी योजना आंखल्या जात आहेत. पण या कार्याला जनतेकडून पवित्र साथ मिळण्यास पाहिजे, आज समाजांत जो तो श्रीमंत बनण्याचा प्रयत्न करीत असतो. इतरांना लुबाडणे, काळाबाजार, लांचलुचपत ही श्रीमंत बनण्याची आजची साधनें होत. धन मेळवूनी कोटी। सवे न येरे लंगोटी ।। पानें खाशील उदंड। अंती जासी मुकल्या तोंड ।। पलगं न्याहाल्या सुचती। शेवटी गोवऱ्या सांगाती।। तुका म्हणे राम। एक विसरतां श्रम ।। ३८३६. देह हे देवाचे, धन कुबेराचे। तेथ मनुष्याचे काय आहे ।। देव देबविता नेता नेववितां। येथे याची सत्ता काय आहे।। निमित्त्याचा धनी केला असे प्राणी। माझे माझे म्हणुनी व्यर्थ गेला ।। ३९४९. कष्टो येईल अंत:काळी। प्राण प्रयाणाचे वेळी।। राहाती निराळी। रांडा, पोरे, सकळ ।। ३९९८. संसारा आलिया एक सुख आहे। आठवावे पाय विठोबाचे।। येणे होय सर्व संसार सुखाचा। न लगे दुःखाचा लेश कांही ।। घेईल तयासी सोपे आहे सुख। बोलियेले मुखें नारायण ।। ४०९९. आयुष्य वेचोनी कुटुंब पोसिले। काय हित केले सांग बापा ।। फुकाचा चाकर झालासी कावाडी। नाही सुख घडी भोगावया ।। तुका म्हणे ऐसे आयुष्य नासिले। पाप ते संचिले पतनासी ।। ४१०७. सुख

ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थ
(११) अनुक्रम ३९५८८ दि: १७.९.५
क्रमांक ९७८६ नों: दि: २५

नाही कोठे आलिया संसारी । वाया हांवभरी होऊं नका ।। दुःख बांदवडीं आहे हा संसार । सुखाचा विचार नाहीं कोठे ।। चवदा कल्पेवरी आयुष्य जयाला। परी तो राहिला ताटीखाली ।। २४८५. न लगे सांडावा आश्रम। उपजले कुळींचे धर्म ।। आणिक न करावे श्रम। एक पुरे नाम विठोबाचे ।। ६४५. निर्वाहापुरते अन्न अच्छादन। आश्रमासी स्थान कोंची गुहा ।। कोठेंही चित्तासी नसावे बंधन। हृदयी नारायण, सांठवावा ।। बोलो नये फार, बैसो जनांमध्ये। सावधान बुद्धि इंद्रियें दमी ।। तुका म्हणे घडी, घडीने साधावी। त्रिगुणाची गोवी उगवुनी ।। १४८६. वर्णाश्रम करिसी चोख। तरी तूं पावशी उत्तम लोक ।। तुजला ते नाहीं ठावे। अंगेची ब्रह्म व्हावे ।। तुका म्हणे देहीं। संत जाहले विदेही ।। ७८२. हल्लीचा गृहस्थाश्रम,-पोहृया, अन्नछत्र घालुनिया घरीं। दंडितो बाहेरी आलियासी ।। १८०२. असा आहे म्हणून:– आता तरी पुढें हाचि उपदेश। नका करुं नाश आयुष्याचा ।। सकळांच्या पाया माझे दंडवत। आपुलाले चित शुद्ध करा ।। हित ते करावे देवाचे चिंतन। करूनिया मन एकविध ।। तुका म्हणे लाभ होय तो व्यापार। करा फार काय शिकवावे ।। १०१.

तुकोबांची मुमुक्षु दशेंतील अवस्था खालीलप्रमाणें होती."मिथ्या आहे सर्व अवघे हे माईक। न कळे विवेक मज कांहीं ।। सर्व बाजागिरी वाटती ही खरी। पहातां येथें उरीं कांहीं नाहीं ।। आतां मज दुःख वाटते अंतरीं। उपाय झडकरी सांग कांहीं ।। पुढे कोण गती न कळे सर्वथा। तुझे पायीं माथा ठेवियेला ।। करणे ते करी सुखे आतां हरी। तुज मी निर्धारी धरियेले ।। स्वहित ते काय न कळे सर्वथा। तारी तूं अनंता तुका म्हणे ।। ४४५४. कैशी करूं तुझी सेवा। ऐसे सांगावे जी देवा।। कैसा आणूं अनुभवा। होशी ठावा कैशापरी ।। कर्मभ्रष्ट माझे मन। नेणे जप तप अनुष्ठान ।। नाहीं इंद्रियांसी दमन। नव्हे मन एकविध ।। नेणे यातीचा आचार। नेणे भक्तीचा विचार ।। मज नाहीं संतांचा आधार। नाहीं स्थीर बुद्धि माझी ।। न सुटे मायाजाळ। नाहीं वैराग्याचे बळ ।। न जिकविता सबळ। काम क्रोध शरीरी ।। आतां राख कैसे तरी। मज नुपेक्षावे हरी ।। तुझी ब्रिदे

चराचरी। तैसी साच करी तुका म्हणे ।। ४४२४. मैत्र केले महाबळी। कामा न येती अंतःकाळीं ।। आधी घे रे रामनाम। सामा भरी हा उत्तम ।। नाहीं तरी यम। दात खातो करकरा ।। धन मेळविले कोडी। काळ घेतल्या न सोडी ।। कामा नये हा परिवार। सैन्य, लोक, बहुफार ।। तंववरी सिरसिसी वळ। जंव आला नाहीं काळ ।। तुका म्हणे बापा। चुकवी चौऱ्याय-शीच्या खेपा ।। ८६.

## दृढनिश्चयात्मक बुद्धी

प्राप्त परिस्थितींत समाधान मानून नामयोगाची कांस धरा. आलिया भोगासी असावे सादर। देवावरी भार घालूं नये ।। भोग तो न घडे संचिता वाचोनी। करावे ते मनीं समाधान ।। २३९६,९७. नाम संकिर्तन साधन पैं सोपे। जळतील पापे जन्मांतरीची ।। न लगती सायास जावे वनांतरा। सुखे येतो घरा नारायण ।। ठायीच बैसोनी करा एकचित्त। आवडी अनंत आळवावा। रामकृष्ण हरी विठ्ठल केशवा। मंत्र हा जापवया सर्वकाळ ।। याविण आणीक नाहीं पैं साधन। वहातसे आण विठोबाची ।। तुका म्हणे आहे सोपे सर्वाहुनी। शहाणा तो धणी घेतो येथे ।। २४५८. हेंचि माझे तप हेंचि माझे दान। हेंचि अनुष्ठान नाम तुझे ।। हेंचि माझे तीर्थ हेंचि माझे व्रत। सत्य हे सुकृत नाम तुझें ।। हाचि माझा धर्म हेंचि माझें कर्म ।। हाचि नित्यनेम नाम तुझे। हाचि माझा योग हाचि माझा यज्ञ। हेंचि जपध्यान नाम तुझे ।। हेंचि माझे ज्ञान, श्रवण मनन। हेंचि निदिध्यासन नाम तुझे ।। हाचि कुळाचार हाचि कुळधर्म ।। हाचि नित्य-नेम नाम तुझें। हा माझा आचार हा माझा विचार। हा माझा निर्धार नाम तुझे ।। तुका म्हणे दुजे सांगायासी नाहीं। नामेविण कांही धन वित्त ।। ३७५५. तुझे नामीं प्रेम देई अखंडीत। नेणे तप, व्रत, दान कांहीं ४०१३. न लागे हा लौकिक सांडावा वेव्हार। घ्यावे वनांतर, भस्मदंड ।। तुका म्हणे मज आणिक उपाव। दिसती ते वाव नामाविण ।। ९६. हे विराट स्वरुप भोळिया भक्तांसी। सर्वथा न कळे हृषीकेशी ।। सगुण रुप

खरु ी त्यासी। लावी भजनांसी तुका म्हणे ।। ६७५. सर्व साधनांचे सार ।। भवसिंधू उतरी पार ।। योग, याग, तपे। केली तयानें अमुपे ।। तुका म्हणे जपा। मंत्र त्रिअक्षरी सोपा ।। ७७२.

संसारांत येवून हें कांहींच साधलें नाहीं तर पुढील यमयातना टाळणें शक्य नाहीं. विषयाचे सुख येथें वाटे गोड। पुढे अवघड यमदंड ।। मारिती झोडिती तोडिती निष्ठूर। यमाचे किंकर बहुसाल ।। असिपत्री तरुवर खैराचे इंगळ। निघतील ज्वाळ तैलयाकीं ।। तप्त भूमिवरी लोळविती पाही। अग्नीस्तंभ वाही कवळविती। म्हणवुनी तुका येतो काकुळती। पुरे आतां याती गर्भवास ।। ६२३,८०५. नको नको मना गुंतू माया-जाळीं। काळ आला जवळी ग्रासावया ।। काळाचिये उडी पडेल बा जेव्हां। सोडविना तेव्हां मायबाप ।। सोडविना राजा देशीचा चौधरी। आणिक सोयरी भलीभली ।। तुका म्हणे तुला सोडविना कोणी। एका चक्रपाणी वाचुनिया ।। २८०८. झाड तोडतांना झाडाला, मानेवर सुरी फिरत असलेल्या शेळ्या, मेंढ्या, गाई बैल इ. उकळत्या पाण्यांत टाकलेल्या कोंबड्यांना, गळाला लागलेल्या माशाला, भाजण्यासाठी विस्तवांत टाकलेल्या डुकराला, थंडी, ऊन, पाऊस यांत अहोरात्र राबणाऱ्या बैल अगर घोड्यांना. डोके ठेचले जात असलेल्या सापाला, खरुज झालेल्या कुत्र्यांना, असाध्य रोग झालेल्या किंवा उपाशी तडफडणाऱ्या माणसांना, यमयातना म्हणजे काय हें चांगलें माहित असतें. चिकित्सक बुद्धीनें निरीक्षण केल्यास असें दिसून येईल कीं, जगांतील निरनिराळ्या प्राण्यांना कमीजास्त प्रमाणांत दुःखें त्याचप्रमाणे भयंकर हालअपेष्टा भोगाव्या लागतात. ते आपल्याच पूर्व कर्माचें फळ होय, हें विसरतां कामा नये. यालाच यमयातना म्हणून संबोधिलें जातें.

आत्मस्वरुप सर्वत्र पसरलेलें आहे. आपणही त्या स्वरुपाचे अंश म्हणजे प्रत्यक्ष परमेश्वर आहोंत. देह आधी काय खरा। देह संबंध पसारा ।। दुजे खंडे तरी उरला तो अवघा हरी। आपणां बाहेरी न लगे ठाव धुंडावा ।। ४५. दाता नारायण स्वये भोगिता आपण। आतां काय

उरले वाचे। पुढ शद्व बोलाग्राचे ।। देखती जे डोळे रुप आपुले ते खेळे तुका म्हणे नाद जाला आवघा गोविंद ।। ३२१. कारे माझा तुज नये कळवळा। असोनी जवळा हृदयस्था ।। ५४३. आवघ्या दशा येणे साधती। मुख्य उपासना सगुण भक्ति ।। प्रगटे हृदयाची मूर्ती। भावशुद्धि जाणोनिया ।। ६४५. ब्रह्म जे देखणे द्वैत जेंव्हा गेले। शरीर ते जाले ब्रह्मरुप। तुका म्हणे सर्व सुख येथें आहे। भ्रांति दूर पाहे टाकुनिया ।। ८०८. घटीं अलिप्त असे रवि। अग्नी काष्ठामाजी जेंवी ।। तैसा नारायण जिवीं। जिवा साक्षी वर्तते ।। भोग ज्याचे तया अंगी। भिन्न प्रारब्ध जगीं ।। विचित्र ते रंगी। रंगें रंगला गोसावी ।। १५२६. लवण मेळवितां जळें। काय उरले निराळें।। तैसा समरस झालो। तुजमाजी हरपलो।। अग्नी कर्पुराच्या मेळी। काय उरली काजळी ।। तुका म्हणे होती। तुझी माझी एक ज्योती ।। २४८४. तुज मज नाहीं भेद। केला सहज विनोद।। तूं माझा आकार। मी तो तूच निर्धार।। मी तुजमाजी देवा। घेसी माझ्या अंगे सेवा।। मी तुजमाजी अचळ। मजमाजी तूं मवळ ।। तूं बोलसी माझ्या मुखें। मी तो तुजमाजी सुखें।। तुका म्हणे देवा। विपरीत ठायीं नांवा ।। ९२७. सचित प्रारब्ध। क्रियमाण ।। अवघा झाला नारायण ।। नाहीं आम्हांसी संबंधु। जरा मरण कांहीं बाधूं।। द्वैताद्वैतभावे। अवघे व्यापियेले देवे।। तुका म्हणे हारी।। आम्हांमाजी क्रीडा करी ।। २९३२. जयापासूनि सकळ। महिमंडळ झाले।। तो एक पंढरिचा राणा। नये श्रुति अनुमाना।। विवादती जयासाठी। जगजेठी तो विठ्ठल ।। तुका म्हणे तो आकळ। आहे सकळ व्यापक ।। २९३४. देहीं असुनिया देव। वृथा फिरलो निर्दैव।। देव आहे अंतर्यामीं व्यर्थ हिंडे तीर्थग्रामीं ।। नाभी मृगाचे कस्तुरी। व्यर्थ हिंडे वनांतरी। साखरेचे मूळ ऊस।। तैसा देही देव दिसे ।। दुधीं असतां नवनीत। नेणे तयाचे मथीत ।। तुका म्हणे मूढ जना। देहीं देव कां पहाना ।। ४४८२. रुप दाखविले होता भिन्न भाव। भक्त आणि देव भिन्न नाहीं ।। ४६०४.

आपण कोण आहोत, आपला एकमेकांचा ऋणानुबंध काय? हें आपण विसरल्यामुळेच जगांत आज अशांततेचें, सर्वत्र दुःखाचें व अविश्वा-

साचें वातावरण पसरलेलें आहे. नारायण भुतीं न कळे जयासी। तया गर्भवासी येणे जाणे ।। येंणे, जाणे होय भूतांच्या मत्सरें। न कळतां खरे देव एसा।। देव ऐसा जया कळला सकळ। गेंली तळमळ, द्वेषबुद्धि ।। बुद्धिचा पालट नव्हे कोणे काळीं। हरी जळी, स्थळीं तया चित्तीं ।। चित्त ते निर्मळ जैसे नवनीत। जाणीजे अनंत तयापाशी ।। तयापाशी हरी जाणिजे त्या भावें। आपले परावे सारिखेची ।। ४५३५. त्याचे सु नाही आले अनुभवा कठीण हे जिवा तोंचि वरी ।। तुका म्हणे सर्व विशीं हा संपन्न। जाणती महिमान श्रुति ऐंसे ।। २९. विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म। भेदाभेद भ्रम अमंगळ।। कोणाही जिवाचा न घडो मत्सर। वर्म सर्वेश्वर पुजनाचे ।। ४६. विश्वी विश्वंभर। बोलो वेदांतीचा सार ।। जगीं जगदीश। शास्त्रें वदती सावकाश ।। व्यापिले हे नारायणें। ऐसी गर्जती पुराणे ।। सूर्याचिया परी। तुका लोकीं क्रिडा करी ।। ३७४७.

आपल्या शरीरावर आपल्याला ताबा ठेवितां आला तर आत्मानुभव दूर नाहीं. क्षुल्लक गोष्टीनेंसुद्धां मनाची चलबिचल होते. विहिरींतील अगर तळचांतील पाणी संथ असते तेव्हां त्यांचा तळ स्पष्ट दिसूं शकतो. आपलें मन स्थिर झालें तर त्याचा तळ म्हणजेच आत्मस्वरूप आपणांस दिसूं शकेल. त्या दृष्टीनेंच मन एका केंद्रांत स्थिर व्हावें म्हणूनच निरनिराळे भक्तिमार्ग अस्तित्वांत आले. त्याचसाठी नामयोग व मूर्तिपूजा अस्तित्वांत आली.

अमुचं हे गांठी बांधू भांडवल। अनाथा विठ्ठल आम्हां जोगा ।। अवघे होती लाभ एका या चिंतनें। नामसंकीर्तनें गोविंदाच्या ।। जन्ममरणाच्या खुटंतील खेपा। होईल हा सोपा सिद्धपंथ।। गेलें पुढें त्यांचा शोधील मारग। चला जावूं माग घेत आम्ही ।। ३८. सकळ चिंतामणी शरीर। जरी जाय अहंकार आशा समूळ ।। मोक्षाचे तीर्थ न लागे वाराणशी। येती तयापाशी अवघी जनें ।। मन शुद्ध तया काय करिसी माळा। मंडित सकळां भूषणासी ।। हरीच्या गुणे गर्जताती सदा। आनंद तया मानसीं ।। तुका म्हणे तो परिसाहुनी आगळा। काय महिमा वर्णू त्याची ।। ५३. करावी

ते पूजा मनेंची उत्तम। लौकिकाचे काय काम असे ।। तुका म्हणे तेणे राहे समाधान। ऐसे हे भजन पार पांडी ।। ७१. आणिकांची स्तुती आम्हां ब्रह्महत्या ।एका वांचुनिया त्या पांडुरंगा ।। आम्हां विष्णूदासा एकविध भाव। न म्हणो या देव आणि कासी ।। शतखंड माझी होईल रसना। जरीं या वचनां, पालटेन ।। तुका म्हणे मज आणिका संकल्पे। अवघीच पापे घडतील ।। २७७. वेदाचे गव्हर न कळे पाठका। अधिकार लोकां नाहीं येरा ।। विठोबाचे नाम सुलभ सोपारे। तारी एकसरे भवसिंधू ।। ३१५. जनी, वनी, अवघा देव। वासनेचा पुसावा ठाव ।। मग बोळंगती वासुदेव। ऐसा मनीं वसूं द्यावा भाव गा ।। ४३४. नेणती वेद श्रुति कोणी। आम्हां भाविकावांचोनी ।। रुप आवडे आम्हांसी। तैसी जोडी हृपी केशी ।। ७५४. धन्य भावशीळ। ज्याचे हृदय निर्मळ ।। पुजी प्रतिमेचे देव। संत म्हणती तेथें भाव ।। विधिनिषेध नेणती। एकनिष्ठा धरुनी चित्ती। तुका म्हणे तैसे देवा। होणे लागे त्यांच्या भावा ।। ७८५. काळ सारावा चिंतने। एकांतवासी गंगास्नाने ।। देवाचे पूजन। प्रदक्षिणा तुळशीच्या ।। युक्त आहार विहार। नेम इंद्रियांचा सार ।। नसावी बासर। निद्रा बहु भापण ।। परमार्थ महाधन। जोडी देवाचे चरण ।। व्हावया जतन। हे उपाय लाभाचे ।। देह समार्पिजे देवा। भार कांहींच न घ्यावा ।। होईल आघवा। तुका म्हणे आनंद ।। ९८६. भक्त ऐसे जाणा जे देही उदास। गेले आशापाश निवरुनी ।। विषय तो त्यांचा झाला नारायण। नावडे जन धन मातापिता ।। निर्वाणी गोविंद असे मागें पुढे। काहींच सांकडे पडों नेदी ।। तुका म्हणे सत्य कर्मा व्हावे साहये। घातलिया भयें नर्का जाणे ।। १३१४. ब्रह्मरस गोडी तयासी फावली। वासना निमाली सकळ ज्यांची ।। तुका म्हणे त्यांचे पायीं पायपोस। होवुनिया वास करी तेथे ।। १६३८. तुका म्हणे जरी होईल निष्काम। तरीच होय राम देखें डोळां ।। २०९६. चारी वेद जयासाठी। त्याचे नाम धरा कंठीं ।। गीता जेणे उपदेशिली। ते ही विटेवरी माऊली ।। २४५६. नामापरते साधन नाही। जे तूं करिती आणिक कांही ।। हाकारोनी सांगे तुका। नाम घेतां राहो नका ।। २७८०. वेद

अनंत बोलिला। अर्थ इतुकाची साधिला ॥ विठोबासी शरण जावें। निजनिष्ठा नाम गावें ॥ सकळ शास्त्रांचा विचार। अंती इतुकाची निर्धार ॥ अठरा पुराणीं सिद्धांत। तुका म्हणे हाचि हेत ॥ ४०६९. नित्य धांवे तेथें नामाचा गजर। घोष जयजयकार आइकतां ॥ हाचि माझा नेम। हाचि माझा धर्म ॥ नित्य वाचे नाम विठोबाचे ॥ ४५०५. पुण्य ऐसे काय रामनामापुढे। काय ते बापुडे याग यज्ञ ॥ जाणोनिया आम्ही दिला जिवभाव। दृढ त्याचे पाय धरियेले ॥ धरियेले आतां न सोडी जिवेसी। केली येचविशी निरधार ॥ ४५०६.

आतापर्यंत मुमुक्षु अवस्थेंतील, निश्चयात्मक बुद्धि स्थिर होण्यास कारणीभूत होणारी विचारसरणी पहिली. आतां साधकावस्था पाहूं:- सुंदर तें ध्यान, उभे विटेवरी। कर कटावरी, ठेवूनिया ॥ कासे पितांबर। तुळसीहार गळा, आवडे निरंतर तेचि रूप ॥ मकरकुंडलें तळपती श्रवणीं। कंठी कौस्तुभमणी विराजीत ॥ तुका म्हणे माझें हेचि सर्व सुख। पाहीन श्रीमुख आवडीनें ॥ गोड तुझें रूप गोड तुझें नाम। देई मज प्रेम सर्वकाळ ॥ विठो माऊलीया हाचि वर देई। संचरोनी राही हृदयांमाजी ॥ ३. कटी पितांबर कास मिरविली। दाखवी वहिली ऐसी मूर्ति ॥ झुरोनी पांजरा होवूं पाहे आतां। येई पंढरीनाथा भेटावया ॥ तुका म्हणे माझी पुरवावी आस। विनंति उदास करूं नये ॥ ५. कन्या सासुऱ्यासी जाय मागें परतोनी पाहे ॥ तैसे झालें माझ्या जीवा। केव्हां भेटसी केशवा ॥ चुकलिया मार्ग। बाळ हुरुहुरु पाहे ॥ जिवनावेगळी मासोळी। तैसा तुका तळमळी ॥ २६६, १०३१. कृष्ण माझी माता कृष्ण माझा पिता। बहिणी, बंधु, चुलता कृष्ण माझा ॥ कृष्ण माझा गुरु कृष्ण माझें तारु। उतरी पैलपारु भवनदीची ॥ कृष्ण माझें मन कृष्ण माझें जन। सोयरा सज्जन कृष्ण माझा ॥ तुका म्हणे माझा श्रीकृष्ण विसावा। वाटे न करावा परता जिवा ॥ ५१६. घेई घेई माझे वाचे। गोड नाम विठोबाचे ॥ तुम्हीं घ्यारे डोळे सुख। पहा विठोबाचे मुख ॥ तुम्ही ऐकारे कान। माझ्या विठोबाचे गुण ॥ मना तेथें धांव घेई। राहे विठोबाचे पायीं ॥ तुका म्हणे

जिवा। नको सोडूं या केशवा ।। ७५६. आणिक दुसरे मज नाही आतां। नेंमिले या चित्ता पासुनिया।। पांडुरंग मनीं पांडुरंग ध्यानीं। जागृती, स्वप्नीं पांडुरंग ।। पडिले वळण इंद्रियां सकळां। भाव तो निराळा नाहीं दुजा।। तुका म्हणें केली नेंत्रीं ओळखण। साजिरें तें ध्यान विटेंवरी ।। ७०२,११२१. लोभीके चित धन बैठे। कामित चित काम ।। माताके चित पुत बैठे। तुकाके मन राम ।। ११७५. पुरे पुरे हा संसार। कर्म बळिवंत दुस्तर।। राहो नेंदी स्थीर। एके ठायीं निश्चळ ।। तुका म्हणे आतां। अवघी तोडी माझी चिंता ।। येवोनी पंढरिनाथा। वास करी हृदयीं।। २२४७. जरी न भरे पोट। तरी सेवूं दरकूट ।। परी न घालूं तुज भार। हाचि आमुचा निर्धार ।। ३९५४. माझे मन पाहे कसून। चित्त न ढळे तुजपासून। कापून देईन शीरे। पहा कृपण कीं उदार ।। मजवरी घाली घण। परी मी न सोडी चरण। तुका म्हणें अंती। तुजवांचोन नाहीं गती ।। ३९६३.

इतकी तयारी झाल्यानंतर सगुण साक्षात्कार दूर नाहीं. सगुण साक्षात्कार म्हणजे आपण ज्या मूर्तीची उपासना करतो, ज्या मूर्तीवर आपली दृढ श्रद्धा असते ती मूर्ति सजीव होऊन भक्ताच्या इच्छेप्रमाणें सगुण रूप धारण करून भक्ताला दर्शन देते तो आनंद अवर्णनीय होय:—

कोरडिया गोष्टी नावडती मना। नाहीं ब्रह्मज्ञानाविण चाड ।। दाखवी आपुले सगुण रुपडे। वंदीन मी तुझे पाय कोडे ।। न लगे तो मोक्ष मज सायुज्यता। नावडे हे वार्ता शून्याकारी ।। तुका म्हणे चाड धरीन ग मुखे। येशील कवतुके जवळीक। ४४५७. माझे केले समाधान। रूप पा जिरे सगुण ।। निववीले मन। आलिंगन देवुनी ।। २२४२. विसरोनी हे पणा। उभा पंढरीचा राणा ।। विटोनी निर्गुणा। रूप धरिले गोजिरे ।। ज ३६५. तुझे रूप पहातां देवा। सुख झाले माझ्या जिवा ।। हें तो वाचे बोलवेना। काय सांगो नारायणा ।। जन्मोजन्मोंचें सुकृत। तुझे पायीं रमे चित्त ।। जरी योगाचा अभ्यास। तेव्हां तुझा निदिध्यास ।। तुका म्हणे भक्त। गोड गाऊं हरीचे गीत ।। ४४६४. मनाला मोहून टाकणाऱ्या या

सगुण साक्षात्कारामुळें भक्ताला आपण आत्मानुभव प्राप्त करून घेऊन मुक्त व्हावें असें वाटतसुद्धां नाहीं. "आम्ही विठोबाचे वीर । फोडूं कळिकाळाचे शीर ।। घेऊं पुढती जन्म । वाणूं कीर्ति मुखें नाम ।। तुका म्हणे मुक्ति । नाहीं आसचि हे चित्तीं ।। १६३६. अशा प्रकारचे सगुण साक्षात्कारी भक्त आपल्या भारतांतच सर्व जातींत मोठ्या प्रमाणावर निर्माण झाले हें थोर भाग्य समजलें पाहिजे. "पवित्र तें कूळ पावन तो देश ।। जेथें हरीचे दास जन्म घेती ।। कर्म धर्म त्यांचे झाला नारायण । त्यांचेनी पावन तिन्हीं लोक ।। वर्ण अभिमानें कोण झाले पावन । ऐसे द्या सांगोन मजपाशी ।। अंत्यजादि यौनी तरल्या हरीभजनें । तयांची पुराणें भाट झाली।। वैश्य तुळाधार गोरा तो कुंभार । धागा ह्या चांभार रोहिदास ।। कबीर मोमीन लतीफ मुसलमान । सेना न्हावी जाण विष्णुदास ।। कान्होपात्रा खोदू पिंजारी तो दादू । भजनी अभेदू हरीचे पायीं ।। चोखामेळा, बंका, जातीचा महार । त्यासी सर्वेश्वर ऐक्य करी ।। नामयाची जनी कोण तिचा भाव । जेवी पंढरीराव तिजसवें ।। मैराळा जनक कोण कुळ त्याचे । महिमान तयाचे काय सांगो ।। यातायाती धर्म नाहीं विष्णुदासा । निर्णय हा ऐसा वेदशास्त्रीं ।। तुका म्हणे तुम्ही विचारावे ग्रंथ । तारिले पतीत नेणो किती ।। ४२९९. अशा प्रकारचे सगुण साक्षात्कारी भक्त निर्माण करण्याचे सामर्थ्य आपल्या आर्य संस्कृतींत आहे. येथें निरनिराळ्या जातींचा प्रश्नच उद्‌भवत नाहीं. कोणी कम्युनिस्ट असा वा समाजवादी अगर भांडवलदार किंवा तटस्थ पक्षाचे असा. तिला त्याच्याशी कांहीं कर्तव्य नाहीं. फक्त जगांत वावरतांना आपण सर्व प्राणिमात्र एकाच परमेश्वराची लेकरें आहोंत, आज आपण भिन्न भिन्न भासत असलों तरी कालांतरानें आत्मानुभव प्राप्त झाल्यानंतर एकच होणार ही दृष्टी ठेवून नेहमीं माणुसकीनें वागावें हीच आर्यसंस्कृतीची शिकवण. अर्चन, वंदन, नवविधा भक्ति । दया, क्षमा, शांति तया ठायीं । तया गांवीं नाहीं दुःखाची वसती । अवघाची भूति नारायण ।। २३५०. एकएका साह्य करूं अवघे धरूं सुपंथ ।। २७३२. इहलोकीचा हा देहे । देव इच्छिताती पाहे । धन्य आम्ही जन्मा

झाले । दास विठोबाचे झालो ।। आयुष्याच्या या साधनें । सच्चितानंद पदवी घेणे । तुका म्हणे पावउणी । करूं स्वर्गाची निशाणी ।।२५४.
दिवसेंदिवस समाजांतून परमार्थ नष्ट होत चालल्यामुळें तुकोबांना आत्म–चर्चा नाहीं जेथें । आगी लावुनि द्यावी तेथें ।।४२१७. असें म्हणावें लागतें.

भक्ताला आनंदमय असा सगुण साक्षात्कार झाला तरी त्यांत त्याला खरें समाधान– आत्मा नारायण सर्वा घटीं असे ।। ४१७८. असा अनुभव आल्याशिवाय प्राप्त होत नाहीं. तुका म्हणे सुख देह निरसनें । चिंतनें चिंतनें तद्रूपता ।। ४३२९. रक्त, श्वेत, कृष्ण, पीत, प्रभा भिन्न । चिन्मय अंजन सुदले डोळा ।। तेणे अंजनगुणें दिव्यदृष्टी झाली । कल्पना निवाली द्वैताद्वैत ।। देश, काल, वस्तू भेद मावळला ।आत्मा निववला विश्वाकार ।। न झाला प्रपंच आहे परब्रह्म । अहं सोहं ब्रह्म आकळले ।। तत्त्वमसि विद्या ब्रह्मानंद सांग । तेचि झाला अंगे तुका आतां ।। ४३१३.

साधकाला सगुण साक्षात्कार झाला तरी पूर्णावस्था– ज्याला आत्मा–नुभव म्हणून संबोधिले जाते ती–प्राप्त होण्याकरितां सद्गुरुची आवश्य-कता असते. हे सद्गुरु आत्मानुभवी असतात. त्यांना शोधावे लागत नाही. आपली परमार्थांत प्रगति झाली म्हणजेच त्यांची भट होते.

## शिष्यांची लक्षणे:-

" देवा ऐसा शिष्य देई । ब्रह्मज्ञानी निपुण पाही ।। जो का भावाचा आगळा । भक्ति प्रेमाचा पुतळा ।। ऐसीं युक्ति ज्याला बाणे। तेथे वैराग्याचे ठाणे ।। ऐसा झाला हो शरीरी । तुका लिंबलोण करी ।। ८११. अशी असतात. त्याचप्रमाणें सद्वस्तूते (आत्मस्वरूप) दाखवी ते सद्गुरु. नुसते कान फुंकणारे ते सद्गुरु नव्हत. दिव्यात तेलवात असली म्हणजे पेटवि-विलेल्या दिव्यावर तो सहज पेट घेतो व त्या दिव्याप्रमाणेंच प्रकाश देऊ शकतो. हे पेटलेले दिवे म्हणजेच आत्मानुभवी सद्गुरु. तुकोबांना सद्गुरु-बोध झाला त्यावर त्यांनी जो अभंग लिहिला त्याचा अर्थ फारच गहन आहे. अशा गहन अर्थानें भरलेले अनेक कोडे संतवाङ्मयांत जागोजाग आढ-ळतात, पण त्यांचे संशोधन कोणी करीत नाही. सामान्य माणसे त्या

 ११४८४

कोडयांचा अर्थ व्यावहारिक दृष्टीनेंच लावतात. जगांतील आपले क्षण-भंगुर अस्तित्व हे परमार्थाच्या दृष्टीनें एकप्रकारचें स्वप्नंच आहे. मला या संसारांतून श्रीनामदेवांनीं श्रीपांडुरंगाबरोबर येऊनजागे केले असा अर्थ-नामदेवे केले स्वप्नांमाजी जागे । या ओवीचा घ्यावयाचा. तुकोबा सगुण साक्षात्कारी होते हे सतत लक्षांत ठेवलें पाहिजे. आपलें अंतःकरण मन, बुद्धि, चित्त व अहंकार या चारांचा संग्रह आहे. हे चार म्हणजेच एक शेर व त्यांतील एक म्हणजेच पावशेर. आणि मजा अशी कीं यांपैकी कोणतेहि एक जेथें असेल तेथें सर्व अंतःकरण येतेच. तुष् तोषणें = संतुष्ट होणें. संतुष्ट होणारें म्हणजेच अंतःकरण. पोटफोडया ष मधील पोटांतील रेषा पुसटल्यामुळे तुषचे ऐवजी तुप शद्व प्रचारांत आला. विश्वावर सत्ता चाल-विणाऱ्या विभूति तुप खाण्यासाठी जगतीतलावर अवतरत नसतात. तुकोबा विसराळू स्वभावाचे असते तर येवढी प्रचंड ग्रंथसंपत्ति त्यांना निर्माण करता आली नसती. ज्यावेळी सद्गुरुबोध झाला, म्हणजेच मी आत्मानुभवी बनलो, त्यावेळीं मला या देहाचा विसर पडला, हें सांगण्या-साठींच त्यांनीं अभंगात– पडिला विसर स्वप्नांमाजी । असें म्हटलें आहे. परमेश्वराचे भजन व भक्ति म्हणजेच त्याचे भोजन. तूं अंतःकरणपूर्वक मला भजत जा हें सांगण्यासाठींच तुकोबांनी भोजना मागती तुष् पावशेर असें सांगितलें आहे. आत्मानुभव प्राप्त झाल्यानंतर आत्मस्वरूप सर्वत्र पसरेलें आहे असा अनुभव साधकाला येतो. प्रारब्ध, क्रियमाण । भक्ता संचित नाहीं जाण ।। अवघा देवचि झाला पाही । भरोनिया अंतर्बाही ।। २९४. अणुरणीया थोकडा । तुका आकाशायेवढा ।। गिळुनि सांडिले कळिवर । भवभ्रमाचा आकार ।। सांडिली त्रिपुटी । दीप उजळला घटी ।। तुका म्हणे आतां । उरलो उपकारापुरता ।। ९९३.

तुकोबांनीं निरनिराळया वितमार्गांचे पर्यवसान खालीलप्रमाणें सांगितलेलें आढळतें.–वेदाचा तो अर्थ आम्हांसीच ठावा । येरांनीं वहावा भार माथां ।। खादल्याची गोडी देखिल्यासी नाहीं । भार घन वाही मजुरीचे ।। उत्पत्ति पाळण संहाराचे निज । जेणे नेले बीज त्याचे हातीं ।।

तुका म्हणे आले आपणचि फळ । हातोहातीं मूळ सांपडले ॥ २२६६. योगाचे ते भाग्य क्षमा । आधी दमा इंद्रियें ॥ अवघी भाग्यें येती घरां । देव सोयरा झालिया ॥ ८१. न करी संग राहेरे निश्चल । लागो नेदी मळ ममतेचा ॥ या नांवे अद्वैत खरे ब्रह्मज्ञान । अनुभवावाचून बडबडते ॥ इंद्रियांचा जय वासनेचा क्षय । संकल्पाही नये वरी मन ॥ तुका म्हणे नये जाणीव अंतरा । अंतरी या धारा आनंदाचा ॥ ११२. अवघ्या साधनांचे सार । न लगे फार शोधावे ॥ तुका म्हणे लटिके पाहे । सांडी देह अभिमान ॥ ११०.

कोणत्याही भक्तिमार्गानें आपण चालू लागलो म्हणजे आपली जसजशी प्रगति होत जाते तसतसे आपल्या ठिकाणीं विश्वावर सत्ता चालविण्याचे सामर्थ्य व सर्व प्रकारचें ज्ञान हळूं हळूं प्राप्त होत असते. "न कळे ते कळो येईल उगवे । नामें या विठ्ठले एकाचिया ॥ न दिसे ते दिसो यईल उगवे । नामे या विठ्ठले एकाचिया ॥ न बोलो ते बोले येईल उगवे । नामे या विठ्ठले एकाचिया ॥ न भेटे ते भेटो येईल आपण करिता चिंतन विठोबाचे ॥ अलभ्य तो लाभ होईल अपार । नाम निरंतर म्हणता वाचे ॥ तुका म्हणे आसक्त जीव सर्वभावे । तरतील नावे विठोबाच्या ॥ ३०४७. योगमार्गानें प्राणायामाचे साह्यानें इडा पिंगला या नाड्यांच्यामधील सुषुम्ना नाडीचें द्वार खुलें होतें व त्यांत कुंडलिनी प्रवेश करून वरवर ब्रह्मरंध्राकडे चढत जाते. त्यावेळी योग्याला सर्व प्रकारचें ज्ञान व सामर्थ्य पायरी पायरीनें प्राप्त होत असते. भक्तिमार्गांतहि हेंच कार्य परा, पश्यंति, मध्यमा व वैखरी या वाचेचे साह्यानें साध्य होतें. आपण उच्चारतो ती वैखरी, गळ्यांत असते ती मध्यमा, हृदयांत पश्यंति व नाभिस्थानालगत परावाचा असते. नामजपामुळें वैखरीचा कुंभ भरला म्हणजे प्रवाह मध्यमेंत जाऊ लागतो. मध्यमेचा कुंभ भरला म्हणजे पश्यंति व नंतर परावाचेचा कुंभ भरावयास सुरवात होते. हें स्थान कुंडलिनीशक्ति जेथें असते तिच्या लगतच असल्यानें हा कुंभ भरला म्हणजे तो हिला जागे करतो. ती जागृत झाली म्हणजे सुषुम्नेचें द्वार, जें सर्वांच्या देहांत नेहमी बंद असतें तें उघडतें व कुंडलिनी तींत प्रवेश करून, तिचा

मस्तकांत असलेल्या ब्रह्मरंध्राकडे जाण्यासाठीं प्रवास सुरु होतो. आपला पाठीचा कणा म्हणजे विश्वांतील रहस्यांचा संग्रह होय. त्यांत ठिकठिकाणीं ज्ञानतंतूचे सांठे भरलेले आहेत. ते सुप्तावस्थेंत असतात. कुंडलिनी शक्ति त्यांना जागे करीत चालते. त्यामुळें सर्व पिंडब्रह्मांडाचे ज्ञान व त्याचबरोबर विश्वावर सत्ता चालविण्याचे अचाट सामर्थ्य साधकाला क्रमाक्रमानें प्राप्त होत असतें. अशा रीतीनें जें कार्य योगमार्गानें साध्य होतें तेंच कार्य भक्तिमार्गानेंहि साध्य होतें. (सर्व धर्मांतील पुराणग्रंथांनीं याच प्राप्त होणाऱ्या सामर्थ्याचे आधारावर ग्रंथ–रचना केली. पण त्यांत कांहीं ठिकाणीं वर्णन करण्याच्या ओघांत, अतिशयोक्ति व विडंबन करण्यांत आलें. त्यामुळें पुराणग्रंथांत सांगितलेलीं उत्तमोत्तम तत्त्वें समाज आकलन करूं शकला नाहीं. त्यामुळें तीं तत्वें समाजाला पारखी झाली. त्याला अनुसरूनच तुकोबांनीं म्हटलें– अर्थ लोपले पुराणीं । घात केला शब्दज्ञानी ।। ५२०. पुराणींचे आणिता मनास । होय कासावीस जीव माझा ।। ७०३)

भावबळें विष्णुदास । नाहीं नाश पावत ।। योगामध्यें घरां येती । सर्व शक्ति चालत ।। १४११. रवि, दीप, हिरा, दाविती देखणे । अदृश्य दर्शनें संताचेनि ।। त्यांचा महिमा काय वर्णूं मी पामर । न कळे तो साचार ब्रह्मादिकां ।। १२६०. तुका म्हणे सत्ता । अवघी आपुलीच आतां ।। १८९६. तुकोबांना याच सामर्थ्याचें बळावर पूर्व जन्माची स्मृति झाली.— अभिमान लागे शुकाचिया पाठीं । व्यासे उपराटी दृष्टी केली ।। जनक भेटीसी पाठविला तेणे । अभिमान नाणे खोटें केले ।। जाऊनिया तेथें साधिली समाधि । तुका म्हणे तधीं होतो आम्ही । २४७८. हें सामर्थ्य काय करूं शकत नाहीं ? पर्वतासी हात लावला अनंते । तो जाय वरते आपोआप ।। आपल्या आपण उचलिला गिरी । गोपाळ हे करी निमित्यासी ।। ४५६७. याच सामर्थ्याचे बळावर तुकोबांना डोहांत बुडविलेल्या अभंगाच्या वह्या ओल्या न होतां परत मिळाल्या. श्री शिवाजी महाराजांना ते कीर्तनांत बसले असतांना संरक्षण मिळाले. शत्रूंना ते तेथें असूनही दिसूं शकले नाहीं. कीर्तन चालू असतांना एक मूल गर्दीत पायांखाली चेंगरल्यानें मृत्युमुखीं

पडलें तें याच सामर्थ्यामुळें जिवंत झाले.– अशक्य तो तुम्हा नाहीं नारायणा । निर्जिवा चेतना आणावया ॥ तुका म्हणे माझे निववावे डोळे । दावुनी सोहोळे सामर्थ्याचे ॥ २३१५. मृत्युसमयीं याच निर्माण झालेल्या सामर्थ्यामुळें तुकोबांना गुप्त होतां आले.– आतां दिसो नये जना । ऐसे करा नारायणा ॥ १५८६. अंतकाळीं बिठोबा आम्हांसी पावला । कुडीसहित झाला गुप्त तुका ॥ १६०६. (वयाच्या ४१ व्या वर्षी फाल्गून वद्य २ सोमवार शके १५७१ विरोध नाम संवत्सरे.)

कांहीं चरित्रकार सांगतात, (अर्थात अंदाजानें) तुकोबांचा खून झाला असावा. संत वाङमयाचा अभ्यास करणारे असे कधींच लिहिणार नाहीत. आत्मानुभव प्राप्त झालेले संत निसर्गावर ताबा चालवूं शकतात. विश्वाचे धनीपण त्यांना प्राप्त झालेलें असतें. सर्वत्र संतांना त्यांच्या साधकावस्थेंत जनतेकडून त्यांचा छळ झालेला आढळतो पण ती एकप्रकारची आपली कसोटीच आहे असें संत मानतात.– निंदो कोणी मारो । वंदो कोणी पुजा करो ॥ मज हेही नाहीं तेही नाहीं । वेगळा दोहीपासूनी ॥ ४८. तुका म्हणे तोचि संत । सोशी जगाचे आघात ॥ ५०. पण शेवटच्या क्षणाला म्हणजे आत्मानुभव प्राप्त झाल्यावर असे होणे शक्य नसते. जगज्जेत्या शिकंदरानें नग्न साधूवर उगारलेलें शस्त्र केवळ त्या साधूच्या नुसत्या दृष्टिक्षेपानें मागच्या मागें गळून पडलें हा इतिहास आहे. मुक्ताबाईला मांडे करण्यासाठीं तेल न देणाऱ्या तेल्यांचे व मांडे भाजण्यासाठीं मडके न देणाऱ्या कुंभाराचे वंशज आजही आळंदीत दिसूं शकत नाहींत. साधुसंतांचा छळ करणारा स्वतःच्या छळासच कारणीभूत होतो हें तुकोबांना त्रास देणाऱ्या रामशास्त्री, सालोमालो किंवा मंबाजी यांच्या झालेल्या शोचनीय अवस्थेवरून दिसून येईल. संतासी क्षोभवी कोण्याहि प्रकारें । त्याचे नव्हे बरे उभय लोकीं ॥ २६९०. तुका म्हणे संता पिडितील खळ । घेती तोंड काळें करुनिया ॥ ३२८०. भूमिवरी कोण ऐसा । गांजूं शके हरीच्या दासा ॥ ३९६४, ही संतमंडळी शेवटच्या क्षणीं आपला मृत्यू केव्हां होणार हें जाणतात. मृत्यूसमयींही परोपकार म्हणून आपला जड देह सत्कारणी लागावा म्हणून जळचरास देतात. श्रीरामप्रभु व श्रीलक्ष्मण

यांनींही हेंच केलें. त्यांचेंच अनुकरण भारतीय संत आजवर करीत आलेले आहेत. आणि त्यासाठींच ते शेवटच्या क्षणीं गुप्त होत असतात म्हणजे ते इतरांना दिसूं शकत नाहीं. तसें सामर्थ्य त्यांना निसर्गतः प्राप्त झालेलें असतें. यालाच चमत्कार म्हणून संबोधिलें जातें. हे चमत्कार साधुसंतांच्या चरित्रांत ओतप्रोत भरलेले आढळतात. ते खोटे मानण्याचे कारण नाहीं. प्रत्येकाला प्रयत्नानें हें शक्य आहे.

हल्लीं बुवाबाजी फार मोठ्या प्रमाणावर सर्वत्र चालू आहे. खानेकू नही मिले । बोले बनगये साधु ।। साधु, संन्यासी, बैरागी, फकीर, वारकरी वगैरेंची बनावट सोंगे सजवून, रंगवून राजरोष समाजाला पोटासाठीं लुबाडलें जातें. त्यांतच पांच पंचवीस अभंग अगर बोधवचनें पाठ असली म्हणजे या धंद्याला विशेष तेजी येते. नको नको मना गुंतू मायाजाळी । जनतेला असा उपदेश करणारे हे महाभाग स्वतःच पोटासाठीं संसारांत गुरफटलेले असतात. पोट भरण्यासाठीं परमार्थाच्या नांवावर फार सोपा असा हा धंदा झाला आहे. त्यापासून सावध रहावें व या धंद्याला बळी पडू नये म्हणून तुकोबांनीं खालील उपदेशपर अभंग सांगितले आहेत.

टिळा, टोपी, माळा, देवाचे गबाळे । वागवी वोंगळे पोटासाठीं ।। तुळसी खोवी कानीं । दर्भ खोवीं शेंडी ।। लटिकी धरी बोंडी नासिकाची ।। कीर्तनाचे वेळीं रडे, पडे, लोळे । प्रेमेविण डोळे गळताती ।। तुका म्हणे ऐसे मायेचे मईंद । त्यापाशी गोविंद नाहीं नाहीं ।। पाषांड करूनी मांडली जिविका । बुडवी, भाविका लोकांप्रति ।। ७८८, ९० . वाचोनी पढोनी जाले शहाणें । म्हणती आम्ही संत।। परनारी देखोनी त्यांचे । चंचळ झाले चित्त।। टिळा, टोपी घालुनी माळा । म्हणती आम्ही साधु ।। दया धर्म चित्ती नाही । ते जाणावे भोंदू ।। कलियुगी घरोघर । संत झाले फार ।। वितीभरी पोटासाठीं । हिंडती दारोदार ।। ४६५ . शाक्त गधडा जयें देशी । तेथें राशी पापाच्या ।। ७९१ लांबवुनी जटा । नेसोनी कासोटा ।। अभिमान मोठा करिताती ।। सर्वांगा करिती विभुती लेपन । पहाती मिष्टान्न भक्षा-वया ।। तुका म्हणे त्यांचा नव्हे हा स्वधर्म । न कळतां वर्म मिथ्यावाद ।।

३९३५. होवोनी संन्यासी भगवी लुगडी। वासना न सोडी विषयांची ॥ निंदिती कदान्न इच्छिती देवान्न। पहाताती मान आदराचा ॥ तुका म्हणे ऐसे दांभिक भजन। तया जनार्दन भेटे केवी ॥ ३९३४. कान फाडोनिया मुद्राते घालिती। नाथ म्हणविती जगांमाजी ॥ घालोनिया फेरा मागती द्रव्यासी। परी शंकरासी नोळखती ॥ पोट भरावया शिकती उपाय। तुका म्हणे जाय नर्क लोकां ॥ ३९३६. कौडी कौडी साठी फोडिताती शीर। काढोनी रुधीर मलंग ते ॥ पांघरती चर्म लोहाची साखळी। मारिती आरोळी धैर्यबळें ॥ ३९३७. दाढी, डोई, मुंडी, मुंडुनिया सर्व। पांघुरती बरवे वस्त्र काळें ॥ उफराटी काठी घेऊनिया हाती। उपदेश देती सर्वत्रासी ॥ चालवुनी रांडा देऊनिया भेष। तुका म्हणे त्यास यमदंडी ॥ ३९३८. होवोनी जंगम विभुति लाविती। शंख वाजविती घरोघरी ॥ शिवाचे निर्माल्य तीर्थ न सेविती। घंटा वाजविती पोटासाठीं ॥ तुका म्हणे त्यासी नाहीं शिवभक्ति। व्यापार करिती संसाराचा ॥ ३९३९. ऐसे नाना भेष घेवोनी हिंडती। पोटासाठीं घेती प्रतिग्रह ॥ ३९४१. अंगी घेवोनिया वारे, दया देती। तया भक्ताहाती चोट आहे ॥ देव्हारा बैसोनी हालविती सुपे। ऐसी पापी पापे लिपताती ॥ एकी बेकी न्याये होतसे प्रचित। तेथे लोक समस्त भुलताती ॥ तयाचे स्वाधीन दैवते असली। तरी का मरती त्यांची पोरे ॥ तुका म्हणे पाणी अंगारा जयाच्या। भक्त कान्होबाचा तोही नव्हे ॥ ४२७६. करी आणिकांचा अपमान। खळ छळवादी ब्राह्मण ॥ तया देतां दान। नर्का जाती उभयतां ॥ ३८०६. आणिकांच्या कापिती माना। निष्ठूरपणा पार नाहीं ॥ करिती बेटें उसनवारी। यमपुरी भोगावया ॥ २५६. शिकल्या बोलाचे सांगतिल वाद। अनुभव भेद नाहीं कोणा ॥ पंडित हे ज्ञानी करितील कथा। न मिळती अर्था निजसुखा ॥ तुका म्हणे जैसी लांचासाठीं ग्वाही। देतील हे नाहीं ठावी वस्तू ॥ २९३. कथा करोनिया द्रव्य घेती देती। तया अधोगति नर्क वास ॥ १४७०. नाइकावे कानीं तयाचे ते बोल। भक्तिविण फोल ज्ञान सांगे ॥ १४७१. कथा करितो देवाची। अंतरीं आशा बहु लोभाची ॥ तुका म्हणे तोचि वेश्या। त्याचे

ह्मणून थोबाड फोडा ।। ४०२१. वैराग्य, भक्ति किंवा ज्ञान यांचा लवलेश नसलेल्या अशा या सोंगांना कोणीहि बळी पडूं नये. उदक, अग्नी, धान्य, झाल्या घडे पाक । एकाविण एक कामा नये । भक्ति ते नमन वैराग्य तो त्याग । ज्ञान ब्रह्मी भोग ब्रह्म तनु ।। २१८८.

ज्याला परमार्थ साधावयाचा असेल त्यानें सत्संगति जोडली पाहिजे. न लगे चंदना सांगावा परिमळ । वनस्पति मेळ हाकारोनी ।। अंतरिंचे धावें स्वभावें बाहेरी । धरितांहि परि आवरेना ।। सूर्य नाही जागे करीत या जना । प्रकाशकिरण कर म्हून ।। तुका म्हणे मेघ नाचवी मयूरे । लपवितां खरे येत नाहीं ।। चंदनाचे हात पायही चंदन । परिसा नाहीं कोणी अंग ।। दीपा नाहीं पाठीं पोटीं अंधःकार । सर्वांगे साकर अवघी गोड ।। तुका म्हणे तैसा सज्जनापासून । पहाता अवगुण मिळेचिना ।। २८९,९०. संत समागम एकादियापरी । रहाद्ये त्यांचे द्वारी श्वान याती ।। तुका म्हणे सर्व सुख त्या संगति । घडेल पंगति संताचिया ।। ३७४. देव वसे चित्ती । त्याची घडावी संगती ।। २४७१. घातले दुकान देती आलियासी दान । संत उदार उदार भरले अनंत भांडार ।। २६३८. संत चरणरज लागतां सहज । वासनेचे बीज जळोन जाय ।। तुका म्हणे साधन सुलभ गोमटे । परी उपतिष्टे पूर्व पुण्यें ।। ४३६४. मज बहू गोड संत आणि महंत नित्य आठवीन ओवियेसी ।। निवृत्ति ज्ञानदेव सोपान चांगया । जिवलगा माझिया नामदेवा ।। नागोजन मित्रा नरहरी सोनारा । रोहिदास कबीरा सोईरिया ।। परसो भागवता सुरदास सावंता । गाईन नेणतां सकळांसी ।। चोखामेळा संत जिवाचे सोईरे । न पडे विसर यांचा घडी ।। जिवाच्या जीवना एका जनार्दना । पाटका, कान्हया, मिराबाई ।। आणिकही संत महानुभाव मुनी । सकला चरणीं जीव माझा ।। आनंदे ओविया गायीन मी त्यांसी । जाती पंढरीशी वारकरी ।। तुका म्हणे माझा बळिया मायबाप । हर्षे नांदो सवे घराचारी ।। १५६८.

## दुर्जनांची संगति टाळली पाहिजे

आणिकांच्या घाते । ज्यांची निवतील चित्तें ।। तेचि ओळखावे पापी ।

निरपवासी शिघ्र कोपी ।। कान पसरोनी एके । वदे दुष्ट वाणी ।। तुका म्हणे भांडा । धीर नाहीं ज्याच्या तोंडा ।। २८२. विष नवनिता विष करी सगे । दुर्जनाच्या त्या गें सर्व हित ।। ११२०. निंबाचिया झाडा साखरेचे आळे । आपली तीं फळें न संडीच ।। ३४९०. डोई वाढवूनी केश । भुते आणिती अंगात ।। तरी ते नव्हेती संतजन । तेथें नाहींआत्मखुण ।। मेळवोनी नरनारी । शकून सांगता नानापरी । तुका म्हणे मैन्द । नाहीं त्यापाशी गोविंद ।। ७७६.

आपली आर्यसंस्कृति वेदांवर आधारलेली आहे. त्याला अनुसरून तुकोबांनीं म्हटलें आहे– धर्म रक्षावयासाठीं । करणे आटी आम्हांसी।। वाचा बोलो वेदनिती । करूं संती केले ते ।। २६०. वंदीन मी भुतें । आतां अवघीची समस्ते ।। तुमची करीन भावना । पदोपदी नारायणा ।। गाळोनिया भेद । प्रमाण तो ऐसा वेद ।। तुका म्हणे मग । नव्हे दुजयाचा संग ।। ७४६. पंडित म्हणता थोर सुख । परि तो पहातां अवघा मूर्ख ।। काय करावे घोकिले ।। वेदपठण वाया गेले । वेदीं सांगितले ते न करी । समब्रह्म नेणे दुराचारी । तुका देखे जिवीं शिव ।। हाचि तेथीचा अनुभव । १६२२. पंडित तोचि एक भला । नित्य भजे जो विठ्ठला ।। अवघे समब्रह्म पाहे । सर्वांभूतीं विठ्ठल आहे ।। १६२३.

## संसारांत कसे वागावे हें तुकोबा शिकवितात

शांति परते नाहीं सुख । येर अवघेचि दुःख ।। म्हणवुनि शांति धरा। उतराल पैलतिरा ।। खवळलिया कामक्रोधी । अंगी भरती आधिव्याधि ।। तुका म्हणे त्रिविध ताप । जाती मग आपोआप ।। ५८०. देव होसी तरी आणिकाते करिसी । सदेह येविषीं करणे न लगे । दुष्ट होसी तरी आणिकाते करिसी । संदेह ये विषीं करणे न लगे ।। ११२८. नम्र झाला भूतां । तेणें कोंडिले अनंता ।। १४८०. ज्यासी आवडी हरी नामाची । तोचि एक बहुसुची ।। जपतो हरिनाम बीज । तोचि वर्णामाजि द्विज ।। तुका म्हणे वर्णाधर्म । अवघे आहे समब्रह्म ।। १५५८. कल्पतरुखाली फळें येती मागितली । तुका म्हणे मनीं । आपुल्याच लाभ हानी ।। २०७२

तुज व्हावा आहे देव । तरी हा सुलभ उपाव ।। अणिकांचे कानीं। गुणदोष मनां नाणी । मस्तक ठेंगणा ।। करी संतांच्या चरणा ।। २४३९. नरस्तुती आणि कथेंचा विकरा । हे नको दातारा घडो देवूं ।। पराविया नारी आणि परधना । नको देवूं मनावरी येऊं ।। भुतांचा मत्सर आणि संत निंदा । हे नको गोविंदा घडो देऊं ।। देह अभिमान नको देऊं शरीरीं । चढो कांहीं परी एक देऊं ।। ऐसीये कृपेची भाकितो करुणा । आहेसी तू राणा उदाराचा ।। तुका म्हणे तुझ्या पायांचा विसर । नको वारंवार पडो देऊं ।। २६३९. थोर ती गळाली पाहिजे अनंता । उपदेश घेतां सुख वाटे ।। व्यर्थ भाराभर केले पाठांतर । जोंवरी अंतर शुद्ध नाहीं ।। घोडे काय थोडे वागविते ओझें । भावेविण तैसे पाठांतर ।। तुका म्हणें धरा निष्ठावंत भाव । जरी पंढरीराव पाविजे तो ।। ३०७४. झुंझायाच्या गोष्टी ऐकताचि सुख। करितां हे दुःख थोर आहे ।। तैसी हरिभक्ती सुळावरील पोळी । तिकडे तो बळी विरळा शूर ।। पिंड पोसलिया विषयांचा पाईक । वैकुंठ नायक कैचा तेथें ।। तुका म्हणे व्हावे देहासी उदार । रखुमा देवोवर जोडावया ।। ३८७४. आत्मा नारायण सर्वा घटीं असे । पशूमध्यें काय कळूं नये ।। देखत हा जीव हुंबरे वरडत । निष्ठुराचे हात वाहती कैसे ।। तुका म्हणे तया चांडाळासी नर्क । भोगिती अनेक महादुःखें ।। ४१७८. काय बा करिशी सोवळे ओवळे । मन नाहीं निर्मळ वाडगेची ।। काय बा करिसी टाळ आणि मृदुंग । जेथें पांडुरंग रंगला नाहीं ।। काय बा करिशी ज्ञानाचिया गोष्टी । करणी नाहीं पोटीं बोलण्याची ।। काय बा करिसी दंभ लौकिकाते । हित नाहीं याते तुका म्हणे ।। ४३३२. खेळतो ते आम्ही नव्हो नारीनर । म्हणोनी विकार नाही तया । तया ठावे आहे आम्ही अवघी एक ।। म्हणोनी निःशंक खेळतील ।। ४५२४.

पारतंत्र्यांत परमार्थ साधणे शक्य नसते. आपल्या डोळ्यासमोर जबरदस्तीनें माणसे बाटविली जातात, स्त्रीवर्गावर अमानुष अत्याचार होतात, अब्रु रक्षणापायी स्त्रियांना अग्नीकुंडांत स्वतःच्या हातानें जाळून घ्यावें लागते, देवळांचा नाश केला जातो, पूजनीय व वंदनीय मूर्तींचे

तुकडें तुकडे केले जातात, अशा वेळीं धर्माचरण शक्य नसते. आणि परकीय सत्ता ते तुम्हाला करूं देणार नाहीं. आमचा धर्म स्वीकारा, म्हणजे तुम्हाला नोकऱ्या मिळतील, त्यांत बढती मिळेल, बायका मिळतील, जनतेला लुबाडलें अगर कांहींही अन्याय केले तरी संरक्षण मिळेल अशा आमीषानें भारतात आजपर्यंत कोटयावधींचें धर्मांतर झाले. निरनिराळया धर्मांच्या आक्रमकांनीं धर्मप्रचारार्थ अंगावर शहारे येणारे, अनन्वित अत्याचार भारतीयांवर केले. त्याचा इतिहास लिहिला गेला. तो आपण सतत डोळयापुढें ठेंविला पाहिजे.

"सामर्थ्य आहे चळवळीचे । जो जो करील तयाचे ।। परंतु आधी भगवंताचे । अधिष्ठान पाहिजे । भगवंताचे अधिष्ठान म्हणजेच सत्याचरणाची सुरवात. लो. टिळक, म. गांधी यांनीं आपल्याला सत्य आणि अहिंसेचे धडे दिले. त्यामुळें आपण निर्भय बनलो. सत्याचरणाचे आधारावर असत्यानें वागणाऱ्या इंग्रजांना सत्याचा धडा शिकवून, त्यांचेपासून स्वातंत्र्य मिळविले. आणि हजारो वर्षे पायांत असलेल्या परदास्याच्या श्रृंखला तोडून स्वतंत्र झालो. या स्वातंत्र्याच्या चळवळीला श्री शिवाजी महाराजांनीं प्रथम आरंभ केला आणि ते त्यांत यशस्वी झाले. हें कार्य एकटयादुकटयाचें नसते. त्याला जनतेच्या सहानुभूतीची आवश्यकता असते. लोकजागृतीचें कार्य श्री समर्थांनीं त्यांच्या हजारो शिष्यांकडून व तुकाराम महाराजांच्या कीर्तनद्वारें उत्तम पार पडलें.

शिवाजी महाराजांचे, धर्मरक्षणार्थ, स्वातंत्र्य प्रस्थापित करण्याचें कार्य, भगवंताचे अधिष्ठान असलेल्या जगदंबेचा आशिर्वाद, त्याचप्रमाणे रामदासांचा व तुकोबांचा सक्रिय पाठिंबा, यावरच यशस्वी झाले. शिवाजी महाराज जन्माला आले नसते तर भारतांतील आपली आर्यसंस्कृति संपूर्ण नष्ट झाली असती.

दिवटया, छत्री, घोडे, । हे तो बऱ्यांत न पडे।। आतां येथें पंढरीराया । मज गोविसी कासया ।। मान दंभ चेष्टा। हे तो शूकराची विष्टा ।।१८८४. शिवाजी महाराजांनी तुकोबांना सन्मानाने बोलावणें पाठविलें, त्यावेळचे

पंढरीनाथापुढे काढलेले हे उद्गार त्यांचे ठिकाणीं असलेलें कडकडीत वैराग्य दर्शवितात. अरण्यवासी आम्ही फिरो उदासीन। दर्शनही हीन अमंगळ।। वस्त्रावीण काया, जालीसे मळीण। अन्नरहित हीन फळाहारी ।। रोडके हातपाय दिसे अवकळा। काय तो सोहळा दर्शनाचा ।। तुका म्हणे माझी विनंती सलगीची। वार्ता हे भेटीची करूं नका ।। १८८६. निःस्पृहपणा आणि त्याचबरोबर लीनता, ही तुकोबांच्या अंगवळणी पडली होती. सबंध राज्याची सनद रामदासांच्या झोळींत पडली पण ती साभार परत दिली गेली. त्याचप्रमाणें हजारो रुपये किमतीचा शिवाजी महाराजांनी तुकोबाना पाठविलेला नजराणा, जशाचा तसाच परत गेला. तुकोबा मानापमानापासून दूर होते. लौकिकाची त्यांना चाड नव्हती. परमेश्वराव्यतिरिक्त कोणाचीही मर्जी संपादन करण्याची हांव नव्हती इतके ते निःस्पृह होते. न हो केविलवाणी नाहीं [आम्ही] दीन। सर्वदा शरण पांडुरंग ।। इतके ते स्वाभिमानीही होते. छत्रपति शिवाजी महाराजांना उपदेशपर पत्र पाठवितांना, सत्संगतीसाठीं, सद्गुरु रामदासाचे भूषण। तेथें घालीं मन, चळो नको ।। १८८७. असे बजावून सांगितलें. तसेंच राज्य टिकावें व तें कायम रहावें म्हणून सावध राहण्यासाठीं सूचना दिल्या. परिसावें कोण राज्याचे रक्षक। विवेकाविवेक पाहुनिया ।। आणि शेवटीं मुक्त होण्यासाठीं:- आत्मारामी मन ठेवुनिया राहे। रामदासी पाहे आपणे या ।।१८८९. रामदास आणि आपण एकच आहोत असे समजून आपल्या आत्मस्वरूपांत मन स्थिर ठेव हें सांगण्यास विसरलें नाहीं. असे होते आपलें तुकाराम महाराज.

तुकाराम महाराजांचे कांही अभंग फार गहन अर्थानें भरलेले आहेत. त्यांतील मतितार्थ (मर्म) समजल्यावर मात्र ते सोपे वाटतात. हात, पाय, मिळोनी मेळा। चला म्हणती पाहो डोळां ।। देखणी नव्हे देखती कैसे। सकळांचा देखणा डोळाचि असे ।। डोळ्याचा डोळा पाहो गेला। तुका म्हणे पाहो ठेला ।। ४१७४. तुकोबांचे सर्व ब्रह्मज्ञान या एका अभंगात

सांठविलेले आहे. आपला देह हात पाय मिळून पंचवीस तत्त्वांचा बनला गेला, याबाबतचे विवरण पूर्वीच आलें आहे. या समुदायानिशी ( अर्थात त्यांत डोळा म्हणजे दृष्टी आलीच ) म्हणे परमेश्वराचा शोध करूं. हे शक्य तरी आहे काय? तो जर आपणांपासून विभक्त असता, तर आपल्या डोळ्यांना इतर जग दिसते त्याप्रमाणे तोही दिसला असता. म्हणून बाह्य जगांत त्याचा शोध न करितां, अंतर्मुख होवून ( आपण मूर्तीपूजा म्हणजे सगुण भक्ति करतो, नामयोग अनुसरतो, त्यामुळे देवाचा ध्यास लागतो. चित्तशुद्धी झाल्यानंतर चित्त निर्विषय म्हणजेच एकाग्र होते व ते आपोआप अंतर्मुख बनते. ) आपल्या देहांत बसून डोळ्यानें कोण पहातो, कानानें कोण ऐकतो, जिव्हेनें कोण चव घेतो हें पहा म्हणजेच ज्याच्या दर्शनासाठीं तू प्रयत्न करीत आहेस ते तेंच आहे म्हणजेच तें मी आहे किंवा " अहं ब्रह्मास्मि " मी ब्रह्म आहे असा अनुभव येईल. याच आत्मानुभवासाठीं तुकोबांनीं आयुष्यभर अट्टाहास ( प्रयत्न ) केला आणि त्यांत ते यशस्वी झाले.

ॐ तत्सत् ।

११८८४

REFBK-0011484

आगामी प्रकाशन— सत्याचा शोध अर्थात् आत्मानुभव.

लेखक: प्रकाशक: — मुरलीधर गोविंद रत्नपारखी
नांदगांव (नासिक)

मुद्रक:— नारायण दामोदर चंद्रात्रे २२१९ विज्ञान छापखाना
नासिक.